महापालिका आयुक्त कार्यालय
पुणे महानगरपालिका, मुख्य इमारत
शिवाजी नगर पुणे - ४११००५
Email id :mco@punecorporation.org
फोन क्र. ०२०- २५५०११००
जावक क्र. मआ/साप्रवि/ ४८७४
दिनांक : १३/१०/२०२०

## आदेश

विषय:- कोरोना विषाणूमुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाच्या प्रतिबंध व नियंत्रण याबाबतचे सुधारित आदेश-लॉकडाऊन टप्प्याटप्याने उठविणे आणि या कालावधीत प्रतिबंधने कमी करणेबाबत (मिशन बिगिन अगेन).

संदर्भ :- १) अधिसूचना सार्वजनिक आरोग्य विभाग,गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल,मंत्रालय मुंबई क्रमांक कोरोना २०२०/प्र क्र.५८/आरोग्य- ५, दिनांक १४ मार्च २०२०

२) आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५

३) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम, १८९७

४) महाराष्ट्र कोविड-१९ उपाययोजना नियम, २०२०

५) महसूल व वनविभाग,महाराष्ट्र शासन यांचे आदेश क्र. DMU/2020/CR.92/DISM-1/दिनांक १७ एप्रिल २०२०, २१ एप्रिल २०२०,२९ जून २०२०,६ जुलै २०२०, ३१ जुलै २०२०, ३१ ऑगस्ट २०२०, ३० सप्टेंबर २०२०

६) मा आयुक्त ,पुणे महानगरपालिका यांचे आदेश जा.क्र.म.आ/साप्रवि/२९२३, दि.३१.०७.२०२०

७) मा आयुक्त ,पुणे महानगरपालिका यांचे आदेश जा.क्र.म.आ/साप्रवि/२९३३, दि.०१.०८.२०२०

८) मा आयुक्त ,पुणे महानगरपालिका यांचे आदेश जा.क्र.म.आ/साप्रवि/२९३४, दि.०३.०८.२०२०

९) मा आयुक्त ,पुणे महानगरपालिका यांचे आदेश जा.क्र.म.आ/साप्रवि/२९६४, दि.०४.०८.२०२०

१०) मा आयुक्त ,पुणे महानगरपालिका यांचे आदेश जा.क्र.म.आ/साप्रवि/३३६१, दि.१७.०८.२०२०

११) मा आयुक्त ,पुणे महानगरपालिका यांचे आदेश जा.क्र.म.आ/साप्रवि/३७९१, दि.०२.०९.२०२०

१२) मा आयुक्त ,पुणे महानगरपालिका यांचे आदेश जा.क्र.म.आ/साप्रवि/४६१५,
दि.०१.१०.२०२०

१३) मा आयुक्त ,पुणे महानगरपालिका यांचे आदेश जा.क्र.म.आ/साप्रवि/४६२३,
दि.०४.१०.२०२०

मे. राज्य शासनाच्या संदर्भ क्र. ५ च्या आदेशाच्या अनुषंगाने संदर्भ क्र. १२ अन्वये आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. साथरोग अधिनियम १८९७, आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ व महाराष्ट्र कोविड-१९ उपाययोजना नियम, २०२० अन्वये प्राप्त अधिकारान्वये **मी विक्रम कुमार, आयुक्त, पुणे महानगरपालिका,** पुणे महापालिका क्षेत्रातील मैदानी खेळांच्या सरावास परवानगी देण्याच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे सुधारित आदेश निर्गमित करीत आहे.

१. पुणे महानगरपालिका क्षेत्रातील प्रतिबंधित क्षेत्राबाहेरील क्षेत्रामध्ये क्रिकेट, खो-खो, इ. मैदानी खेळ (Outdoor) तसेच ज्या खेळांमध्ये सुरक्षित अंतर राखून (Social Distancing) खेळता येणारे इनडोअर खेळ उदा. बॅंडमिटंन, लॉंन टेनिस, इ. या खेळांच्या सरावाकरिता खालील मार्गदर्शक सूचना / अटींच्या अधीन राहून परवानगी देण्यात येत आहे.

२. प्रतिबंधित क्षेत्राबाहेरील क्षेत्रामध्ये क्रिकेट, खो-खो, इ. मैदानी खेळ (Outdoor) तसेच ज्या खेळांमध्ये सुरक्षित अंतर राखून (Social Distancing) खेळता येणारे इनडोअर खेळ उदा. बॅंडमिटंन, लॉंन टेनिस, इ. या खेळांच्या सरावाकरिता परवानगी देण्यात येत आहे. संदर्भ क्र. ११ चे आदेशामध्ये नमूद केलेनुसार सर्व प्रकाराच्या क्रीडा स्पर्धा /उपक्रम/ संमेलने घेण्यास बंदी राहील.

३. सदर आस्थापनांनी गर्दी टाळण्यासाठी व सोशल डिस्टन्सींगच्या नियमांचे पालन करण्यासाठी सरावाकरिता आवश्यक तेवढ्याच / मर्यादित खेळाडूंना प्रवेश देण्यात यावा व सर्वांनी मास्कचा वापर करणे बंधनकारक राहील.

४. वयवर्ष १० वर्षाच्या आतील मुलांना तसेच ६५ वर्षावरील व्यक्तींना प्रवेश देता येणार नाही.

५. सरावास येणाऱ्या खेळाडू तसेच कर्मचारी यांची प्रवेशद्वाराजवळ थर्मल स्क्रीनिंगद्वारे तपासणी करण्यात यावी.

६. इनडोअर हॉलमध्ये सराव करताना दारे, खिडक्या उघडी ठेवावीत. व ए.सी. चा वापर टाळावा. ए.सी वापरणे अनिवार्य असल्यास त्या यंत्रणेचे वेळोवेळी निर्जंतुकीकरण करण्यात यावे. शक्य असल्यास पोर्टेबल हाय एफीशियंसी एअर क्लिनर बसवावेत.

७. मैदानावर / इनडोअर हॉल येथे वारंवार निर्जंतुकीकरण करण्यात यावे.

८. खेळासाठी वापरण्यात येणाऱ्या क्रीडा साहित्यांचे वापरापूर्वी व वापरानंतर निर्जंतुकीकरण करण्यात यावे.

९. मैदानाच्या प्रवेशद्वारावर तसेच मैदानावर / इनडोअर हॉल येथे ठिकठिकाणी हॅन्ड सॅनिटायझर उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे.

९. सोशल डिस्टन्सींगच्या नियमांचे पालन करणे आवश्यक राहील.

१०. सदर आस्थापनांनी त्यांचे कर्मचाऱ्यांची कोविड-१९ चाचणी करण्यात यावी. तसेच कर्मचाऱ्यांनी मास्क, ग्लोव्हज, फेसशिल्ड यांसारख्या सुरक्षा साधनांचा वापर करावा.

११. संबंधित आस्थापनांनी कोविड-१९ संदर्भात लक्षणे नसलेल्या खेळाडूंना सरावासाठी प्रवेश देण्यात यावा. ताप, सर्दी, खोकला यांसारखी लक्षणे असल्यास प्रवेश देण्यात येऊ नये. कॉटॅक्ट ट्रेसिंगच्या अनुषंगाने सरावास येणाऱ्या खेळाडूंचे नाव, संपर्क क्रमांक, ई-मेल आयडी, दिनांक, वेळ, इ. माहितीच्या नोंदी दररोज ठेवण्यात याव्यात. कॉटॅक्ट ट्रेसिंगच्या अनुषंगाने खेळाडूंची माहिती आरोग्य विभाग किंवा प्रशासनास देणेबाबत त्यांची ना-हरकत घेण्यात यावी.

१२. कोविड-१९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाने तसेच क्रीडा विभागाकडून निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

१३. संदर्भीय आदेशान्वये वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश / मार्गदर्शक सूचना पुढील आदेशापर्यंत लागू राहतील.

कोविड-१९ च्या प्रतिबंधासाठी या कार्यालयाद्वारे वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या आदेशांचे, मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन करणारी व्यक्ती आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ चे कलम ५१ ते ६०, तसेच भारतीय दंड संहितेचे कलम १८८ नुसार अन्य कायदेशीर तरतुदीनुसार कार्यवाहीस पात्र राहील.

सदर आदेश दि. १३/१०/२०२० पासून पुढील आदेशापर्यंत पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रात लागू राहतील.

सदरचा आदेश हा माझ्या सही व शिक्क्यानिशी आज दिनांक १३/१०/२०२० रोजी दिलेला आहे.

MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF POONA
पुणे म्युनिसिपल कॉर्पोरेशन सन-१९५० EST.1950

(विक्रम कुमार)
महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका

प्रत -१) मा.विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे

२) मा. पोलीस आयुक्त,पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे.

३) मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पुणे.

यांचेकडे माहिती व पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित